ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाविवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ — पुणें, बुधवार तारीख ३१ ऑगस्ट, १९६० — अंक ३४

## विविध माहिती

**रशिअन तेलाची आयात**—भारत व रशिआ ह्यांच्यांतील व्यापारी करारास अनुसरून रशिआनें ११,००० टन डिझेल तेल नुकतेंच पाठविलें आहे. ही तेलाची आयात इंडियन ऑइल कंपनी-मार्फत करण्यांत आली आहे. रशिआकडून तेल आयात करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**शिक्षणासाठी दूरचित्रवाणीचा उपयोग**—पुढील वर्षाच्या प्रारंभीं दिल्लीमधील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी टेलिव्हिजनवरून कार्यक्रम करण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या कामीं अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशनची मदत घेण्यांत येईल. टेलिव्हिजनचा उपयोग करून दर आठवड्याला तीन पाठ देण्यांत येतील. प्रत्येक पाठ २० ते ३० मिनिटांचा असेल.

**चालू पिढीला विसरूं नका**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या आराखड्यावर लोकसभेंत बोलतांना आचार्य कृपलानी म्हणाले कीं, नवीन कामें अंगावर घेण्यापूर्वी झालेलें काम पक्कें करण्याकडे लक्ष देण्यांत यावें. वाढत्या किंमती व कर ह्यांनीं लोकांना हैराण केलें आहे. सध्यांच्या पिढीला नियोजनाचे थोडेतरी फायदे मिळाले पाहिजेत.

**अणुशक्तीच्या साह्यानें वीज**—मद्रास राज्यांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणारें एक केंद्र उभारण्यांत यावें अशी मागणी राज्य सरकारतर्फे करण्यांत येत आहे. ह्या मागणीचा नियोजन समिति काळजीपूर्वक विचार करीत आहे. राज्यांतील जलविद्युत्-केंद्रें आतां फारशी वाढवितां येण्यासारखीं नाहींत.

**पंचवार्षिक कार्यक्रमांचें यशापयश**—नियोजन समितीचे एक सभासद श्री. खोसला समितीच्या आरोग्यविभागापुढें बोलतांना म्हणाले कीं, तिसऱ्या व चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें यशापयश कुटुंबनियोजनाच्या यशापयशावर अवलंबून आहे. कुटुंबनियोजन केल्याशिवाय लोकांच्या राहणीचें मान सुधारणें अशक्य आहे.

**निर्वासितांना जमिनी**—दंडकारण्य भागांत उमरकोट ह्या ठिकाणच्या वसाहतींत राहण्यास आलेल्या निर्वासितांच्या कुटुंबांपैकी ७० टक्के कुटुंबांना शेतजमिनी अगर घरें बांधण्यास जमिनी देण्यांत आल्या आहेत. ह्या भागांत १० हजार एकर जमीन लागवडीयोग्य करण्यांत आली आहे.

**कांडलामधील व्यापार**—कांडला बंदरविभागांत मुक्त व्यापाराचा एक टापू निर्माण करण्यांत येणार आहे. त्याचें उद्घाटन बहुधा २६ जानेवारी, १९६१ ला होईल. ह्या टापूची व्याप्ति १६० एकरांऐवजीं १,००० एकर असावी अशा सूचना अनेक व्यापारी संस्थांकडून आल्या आहेत.

**भूतान राज्यांत विमानतळ**—भूतान राज्याला भारताशीं जोडणाऱ्या एकमेव रस्त्याचें काम भारत सरकारच्या मदतीनें चालू आहे. भारतीय एंजिनिअर्स भूतानी मजुरांच्या साह्यानें हा रस्ता तयार करीत आहेत. पण, हा रस्ता तयार होण्यापूर्वीच भूतानमध्यें एक विमानतळ बांधला जाण्याची शक्यता आहे. भूतान सरकार त्या दृष्टीनें पावलें टाकीत आहे.

**कराड येथें विमानतळ**—महाराष्ट्र सरकारनें कराडजवळ विमानतळ बांधण्याचें ठरविलें आहे. कोयनेवरील धरणाच्या जागीं लवकरच जातां यावें म्हणून तो बांधण्यांत येत आहे. विमान-तळाच्या बांधणीसाठी ५ लाख, २० हजार रुपये खर्च येणार आहे. कोयना धरणाचें काम पहाण्यासाठी पुष्कळदां परदेशीय प्रवासी येत असतात.

**पेनिसिलीनच्या प्रतिक्रियेवर औषध**—पेनिसिलिन हें औषध प्रभावी असलें तरी कांहीं लोकांवर त्याची प्रतिक्रिया फार वाईट होते. ह्या प्रतिक्रियेपासून निर्माण होणारा धोका कमी करण्यासाठी अमेरिकेहून एक नवीन औषध आयात करण्यांत येणार आहे. औषधें आयात करण्याचा परवाना मुंबईतील एका कंपनीला देण्यांत आला आहे.

**मद्रास राज्यांत अणुशक्तीवरील वीजकेंद्र ?**—मद्रास सरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मद्रास राज्यांत अणुशक्ती-वरील वीजकेंद्र स्थापन करण्याविषयीं नियोजन समितीला सुचविलें आहे. मद्रास राज्यांतील जलविद्युत् पुरवठा अधिक वाढविता येण्यासारखा नाहीं. राज्यांत अणुशक्तीसाठी लागणारें इंधन भरपूर मिळण्यासारखें आहे.

**रशिअन विमानाची चांचणी**—भारत सरकारच्या सूचनेवरून रशिआनें एक हेलिकॉप्टर विमानचांचणीसाठी धाडलें होतें. ह्या विमानाची चांचणी हिंदी विमानतज्ज्ञांनीं पूर्ण केली आहे. पण, अद्याप ह्या विमानांची मागणी रशिआकडे करण्यांत आलेली नाहीं. चीनच्या हिंदवरील आक्रमणामुळें ह्या विमानांना अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे.

**गुजरातमध्यें लष्करी शिक्षणाची शाळा**—गुजरात व्यायाम प्रसारक मंडळ ह्या संस्थेनें राजपिपला येथें लष्करी शिक्षणाची एक शाळा काढण्याचें ठरविलें आहे. ही शाळा बडोदा येथील भोसले लष्करी शाळेच्या धर्तीवर चालविण्यांत येईल. लष्करांतील वरिष्ठ प्रतीच्या नोकऱ्यांसाठी शाळेंत खास शिक्षण देण्यांत येईल.

## नासधूस थांबविण्यासाठी व बँकिंगच्या सोईसाठी योजना

### माल साठवण्याची गुदामांत सोय

गुदामांत धान्यादि विविध वस्तूंची केवळ सांठवण आणि जतनच केलें जातें असें नसून, तेथें वस्तु ठेवणाऱ्यांना सढळ अटीवर पैसा पुरविण्याच्या सोयीहि उपलब्ध करून दिल्या जातात व अशा रीतीनें त्यास आपला माल किंमतीच्या दृष्टीनें अत्यंत अनुकूल वाटेल अशा वेळीं तो विकण्यास मोकळीक मिळते. हा आहे जुनीं कोठारें आणि गुदामें यांमधील फरक.

देशांतील निरनिराळ्या गुदामांत तज्ज्ञ नोकरवर्गाच्या साह्यानें सुमारें ६० प्रकारच्या वस्तूंची निगा राखण्यांत येते. भारतांत जुन्या पद्धतीच्या कोठारांत सांठवणपद्धतींत जवळ जवळ कांहींच बदल झालेला नाहीं. तथापि गुदामांत शास्त्रीय पद्धतीनें वस्तूंची सांठवण केली जाते.

### कैक वर्षांची निकड

शेतकीविषयक रॉयल कमिशननें गुदामांची सोय करण्याची तांतडीची निकड १९२८ मध्यें निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर चार वर्षांनीं मध्यवर्ती बँकिंग चौकशी समितीनेंहि आपल्या अहवालांत गुदामांना पतविषयक सवलती पुरविण्यावर भर दिला होता. गुदामांचें जाळेंच देशांत निर्माण करावें अशी सूचना रिझर्व्ह बँकेच्या ग्रामीण पतपाहणी समितीनें केली होती. याशिवाय एका कायद्यान्वयें राष्ट्रीय सहकारी आणि गुदाम मंडळाची स्थापना आणि राज्य गुदाम कंपन्यांची निर्मिति करावी असेंहि या समितीनें म्हटलें होतें.

### मंडळें व कॉर्पोरेशन्स यांची स्थापना

या विविध शिफारशींनुसार १९५६ मध्यें शेतमाल ( विकास आणि गुदाम ) कॉर्पोरेशन कायदा संमत करण्यांत येऊन त्याअन्वयें एक राष्ट्रीय सहकारी आणि विकास मंडळ आणि मध्यवर्ती व राज्य गुदाम कॉर्पोरेशन्स स्थापन करण्याची तरतूद करण्यांत आली.

सदर मंडळ १ सप्टेंबर, १९५६ रोजीं अस्तित्वांत आलें. मध्यवर्ती कॉर्पोरेशन जुलै १९५७ मध्यें स्थापन झालें. त्यापुढील दोन वर्षांच्या मुदतींत जम्मू व काश्मीर वगळून देशांतील सर्व राज्यांत गुदाम कॉर्पोरेशन्स स्थापन करण्यांत आलीं. हा नवीनच उपक्रम असल्यानें प्रारंभीं अनेक अडचणींस तोंड द्यावें लागलें. त्यांतल्या त्यांत या नव्या योजनेची यथायोग्य माहिती करून घेऊन शास्त्रीय रीतीनें सांठवणीचें काम करूं शकणाऱ्या नोकरवर्गाची विशेष टंचाई भासे. म्हणून मध्यवर्ती गुदाम कॉर्पोरेशननें खास शिक्षणवर्ग चालू केले. ह्या वर्गांत बँकिंग, हिशोब, रोग व किडी यांचा बंदोबस्त, गुदामांची रचना, सांठवण व तपासणी, या विषयांचें शिक्षण दिलें जाई. आतांपर्यंत ३०० वर व्यक्तींचें शिक्षण पुरें झालें आहे.

### बँकिंगच्या सवलती

गुदामांनीं दिलेल्या पावत्यांवर बँकांकडून पैसा मिळण्याबाबतहि अडचण होती. ही सोय करतां आली नसती तर गुदामें म्हणजे केवळ सांठवणीचीं कोठारेंच राहिलीं असतीं. मध्यवर्ती गुदाम कॉर्पोरेशननें या दृष्टीनें लवकर उपाययोजना केली. रिझर्व्ह बँक, स्टेट बँक आणि इतर बँका यांनीं या नूतन योजनेसाठी खास सवलती देण्याचें जाहीर केलें. रिझर्व्ह बँकेनें अन्नधान्यांवर कर्ज देण्याबाबत शेड्यूल्ड बँकांवरील निर्बंध गुदामांच्या बाबतींत अपवाद करून फार मोठी सवलत दिली. स्टेट बँकहि अगदीं पहिल्यापासून या उपक्रमास सहकार्य देत आली आहे. गुदाम असून आपली शाखा नाहीं अशा शहरीं पे ऑफिस किंवा उपकचेरी उघडण्याचा स्टेट बँकेचा निर्णय या दृष्टीनें अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणावा लागेल. तसेंच या बँकेकडून ज्या वस्तूंवर कर्ज मिळत असे त्यांच्या यादींतहि भर टाकण्यांत आलेली आहे. इतर शेड्यूल्ड बँका आणि सहकारी बँकाहि गुदामांच्या पावत्यावर कर्ज देतात. हें कर्ज मिळण्याची पद्धतीहि सुटसुटीत करण्यांत आलेली आहे.

### २९ मध्यवर्ती गुदामें

मध्यवर्ती गुदाम कॉर्पोरेशनचीं देशांत सध्यां २९ गुदामें आहेत. यंदा व्यापारी दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणीं मिळून आणखी ११ गुदामें सुरू केलीं म्हणजे ही संख्या ४० होईल व अशा रीतीनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील याबाबतचें लक्ष्य गांठलें जाईल.

अन्नधान्यांच्या जोडीस गुदामांतून ताग, गूळ, आलें, मिरी आणि खोबरें या जिनसाहि ठेवण्याची केलेली सोय हा गतवर्षांतील प्रगतीचा एक महत्त्वाचा टप्पा होय. या सोयींत यंदा आणखी वाढ करण्यांत येईल. सफरचंदें आणि बटाटे याकरितां शीत सांठवणीची, तसेंच निर्यात करावयाचीं वनस्पति-तेलें, काकवी, लोकर व लाख यांची सांठवण करण्याची व्यवस्था करण्याचा विचार आहे.

### राज्य गुदामें

निरनिराळ्या राज्य गुदाम कॉर्पोरेशन्सची सध्यां १४८ गुदामें चालू असून आर्थिक वर्षांत आणखी १२७ गुदामें उघडण्याचा बेत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत राज्यांच्या कॉर्पोरेशन्स-कडून ३५६ गुदामें उघडण्यांत येणार आहेत व त्यांत एकूण ४,९६,००० टन माल ठेवतां येईल.

दर दिवसागणिक अधिकाधिक शेतकऱ्यांना गुदाम योजनेचे फायदे लक्षांत येऊं लागले आहेत. भारतासारख्या देशांत दरवर्षी कीड, उंदीर, वगैरेंमुळें सुमारें ३० लक्ष टन अन्नधान्याची नासाडी होते. परंतु या वाया जाणाऱ्या धान्यापैकी जितकें धान्य आपण चांगल्या स्थितींत ठेवूं, तितक्या प्रमाणांत साहजिकच आपणांस कमी धान्याची आयात करावी लागेल आणि यासाठींच गुदामांची सारी धडपड असते. याशिवाय गुदामांत माल ठेवण्यानें कर्ज मिळण्याची सोय होते तो फायदा वेगळाच !

---

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें

### शेतीविषयक नियतकालिकें

संग्रहालयानें चालविलेल्या ग्रंथालयांत औद्योगिक व शास्त्रीय विषयावरील नियतकालिकें नियमितपणें येत असतात. यांपैकी शेती-विषयक नियतकालिकांची यादी खालीं दिली आहे. ग्रंथालय कॉमनवेल्थ इमारतींतील तळमजल्यावरील मागील दिवाणखान्यांत आहे व याचा उपयोग कोणासहि विनामूल्य करतां येतो. ग्रंथालय उघडें असण्याची वेळ बुधवार व सणाखेरीज दररोज सकाळीं ९ ते सायंकाळीं ६ अशी आहे.

( १ ) भगीरथ ( २ ) मीट ट्रेड जर्नल ( ३ ) इंडियन कोकोनट जर्नल ( ४ ) कोकोनट बुलेटिन ( ५ ) ब्रिटिश बी. जर्नल ( ६ ) न्यूझीलंड बी कीपर्स ( ७ ) कॅनेडियन बी कीपर ( ८ ) फार्मिंग न्यूज ( ९ ) फार्म इम्प्लीमेंट अँड माशिनरी रिव्ह्यू ( १० ) फार्म मेकानाइझेशन ( ११ ) फूड मॅन्युफॅक्चर ( १२ ) इंडियन फार्मिंग ( १३ ) इरिगेशन अँड पॉवर ( १४ ) इंडियन जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्स ( १५ ) बहार ( १६ ) न्यूझीलंड जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल ( १७ ) साउथ आफ्रिकन बी जर्नल ( १८ ) शेतकरी ( १९ ) वर्ल्ड क्रॉप्स ( २० ) खेडूत बंधु ( २१ ) ऑस्ट्रेलिअन मॅन्युफॅक्चरर ( २२ ) सिंद्री न्यूज.

# अर्थ

बुधवार, ता. ३१ ऑगस्ट, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जलविद्युत् योजनांसाठी योग्य जागांची पाहणी

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जलविद्युत् योजनांची पाहणी-तपासणी करण्यावर अधिक भर देण्यांत येणार आहे. राज्य सरकारांना हें काम करतां यावें म्हणून अधिक पैसा देण्यांत येण्याचीहि शक्यता आहे. ह्या दृष्टीनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अल्पशी सुरुवातहि करण्यांत आली आहे. प्रत्येक राज्यांत जलविद्युत् योजनांची उभारणी करतां येण्यासारख्या योग्य अशा कोणत्या जागा आहेत त्यांचा शोध घेतां यावा म्हणून राज्य सरकारांना आर्थिक मदत देण्यांत आली होती. विद्युत्शक्तीचा अधिक विकास करण्याची पाळी येईल त्या वेळीं पाहणी–तपासणी केलेल्या विद्युत्निर्मितियोजना मोठ्या संख्येनें हाताशीं असाव्या म्हणून ही मदत देण्यांत आली होती. भारतांत जलप्रपाताचा फायदा घेऊन सुमारें ४ कोटी किलोवॅट वीज निर्माण करतां येईल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. पण ह्याचा अर्थ, ही सर्व अगर त्यांपैकी बरीच वीज प्रत्यक्ष निर्माण करण्यांत येत आहे असा नव्हे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ५८ लाख किलोवॅट वीज निर्माण करूं शकणारीं जलविद्युत् केंद्रें भारतांत असतील व विजेचें प्रत्यक्ष उत्पादन २१ लाख किलोवॅटच्या जवळपास असेल. वीजनिर्मितीच्या शक्यतेच्या मानानें प्रत्यक्ष उत्पादन अल्पच आहे. ज्या ठिकाणीं जलविद्युत् निर्माण होण्यासारखी भौगोलिक परिस्थिति आहे त्या ठिकाणांची अद्याप पूर्णपणें तपासणी करण्यांत आलेली नाहीं. त्यामुळें प्रत्येक ठिकाणाच्या वैशिष्ट्याचा फायदा घेऊं शकतील अशा योजना आंखता आलेल्या नाहींत.

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीला भारतामधील जलविद्युत् केंद्रांतून ४० लाख, ७५ हजार किलोवॅट वीज निर्माण करतां येईल अशी व्यवस्था होईल. त्यांशिवाय आणखी कांहीं योजनांचें काम हातीं घेण्यांत येईल. तथापि ह्या योजना पूर्ण होण्यास चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची वाट पाहावी लागेल. त्या पूर्ण झाल्यावर विजेच्या उत्पादनांत आणखी ३० लाख किलोवॅटसूची भर पडेल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पाणी-पुरवठ्याच्या व वीजउत्पादनाच्या कोणत्या महत्त्वाच्या व मोठ्या योजना हातीं घ्याव्या हें अद्याप निश्चित करण्यांत आलेलें नाहीं. नियोजन समिति ह्यासंबंधी विचार करीत आहे. राज्य सरकारांनीं विद्युतनिर्मितीच्या आपआपल्या योजना चालू महिना-अखेर नियोजन समितीला कळवावयाच्या आहेत. ह्या योजनांविषयीं येत्या नोव्हेंबर महिन्यांत राज्यसरकारांशीं चर्चा करण्यांत येईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पाणीपुरवठ्याच्या मोठ्या योजनांवर बराच पैसा खर्च करण्यांत येणार आहे. ह्या गुंत-वणुकीपासून कमींत कमी काळांत जास्तींत जास्त फायदा कसा मिळेल ह्याकडे नियोजन समिति विशेष लक्ष देणार आहे. पहिल्या व दुसऱ्या कार्यक्रमांत ज्या पाणीपुरवठ्याच्या योजना सुरू करण्यांत आल्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी ६२० कोटी रुपये लागणार आहेत. त्यांपैकी ४७० कोटी रुपये तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पुरविण्यांत येतील

## अन्नधान्याच्या बाबतींत चिंतेचें कारण नाहीं

भारत-सरकारचे अन्न व शेतकीमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं मद्रास येथें एका प्रसंगीं बोलतांना देशाच्या अन्नधान्य-विषयक परिस्थितीबद्दल आत्मविश्वासाचे उद्गार काढले आहेत. ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, गेल्या कांहीं वर्षांत अन्नधान्याच्या बाबतींत चिंता वाटण्यासारखी परिस्थिति होती. पण आतां ती तशी राहिलेली नाहीं किंवा पुढेंहि काळजी वाटण्या-सारखी परिस्थिति उत्पन्न होणार नाहीं. ह्या बाबतींत अमेरिकन सरकार व लोक ह्यांनीं जी मदत केली आहे तिचें कृतज्ञतापूर्वक स्मरण ठेवलें पाहिजे. गव्हासाठी विभाग पाडण्याचें आतां कारण उरलेलें नाहीं. तांदुळाचें उत्पादनहि झपाट्यानें वाढत आहे. एक-दोन वर्षांच्या अवधींत तांदुळाबाबतहि विभागीय पद्धतीचा अवलंब करण्याचें कारण उरणार नाहीं. अलीकडे अन्नधान्याच्या किंमती स्थिर ठेवण्यासंबंधीं बरीच चर्चा चालू झाली आहे. पण अन्न-धान्याच्या किंमती कृत्रिम उपायांनीं स्थिर राखतां येणार नाहींत. किंमती स्थिर ठेवण्यासाठी सरकारला किंमतींतील कांहीं भाग सोसावा लागतो आणि हें करण्यासाठी अर्थातच पैसा लागतो. अमेरिकेची अर्थव्यवस्था सूत्रबद्ध असल्यानें तेथें हें शक्य होतें. अमेरिकेंत शेतकऱ्याला आर्थिक मदत म्हणून सरकार ३,००० कोटी रुपये खर्च करूं शकतें व त्यामुळें ४,५०० कोटी रुपये किंमतीचें शिलकी धान्य निर्माण होतें. ह्या गोष्टी हळुहळू भारतांतहि येणार आहेत ह्याविषयीं शंका नाहीं. दरम्यान, शेतकऱ्यांची व्यावसायिक दृष्टि जशी बदलेल त्या प्रमाणांत भारताला अन्न-धान्याबद्दल काळजी करावी लागणार नाहीं.

---

## आर्थिक दैनिकाचा किफायतशीरपणा

मुंबई येथें प्रसिद्ध व्हावयाच्या, आर्थिक विषयांच्या इंग्रजी दोन दैनिकांची घोषणा झाली आहे. देशांतील आर्थिक विकासाचें तें लक्षण आहे. ह्या संबंधांतील ‘ दि फिनॅन्शिअल टाइम्स ’ ह्या लंडन येथील आर्थिक दैनिकाचे आंकडे उद्बोधक होतील. १९५९ अखेर त्याचा रोजचा खप १,०९,२७४ प्रतींचा होता; १९५८ अखेर तो ८६,००४ प्रतींचा होता; जून १९६० अखेर तो १,२०,००० प्रतींवर गेला आहे. जाहिरातींपासून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी ५४% मोठ्या सचित्र जाहिरातींपासून, २७% कंपन्यां-च्या सभा-वृत्तांतापासून, ११% छोट्या जाहिरातींपासून आणि ८% नव्या भांडवल उभारणीच्या जाहिरातींपासून मिळतें. दि फिनॅन्शिअल टाइम्स लि. नें १९५९ अखेरचें ३५% डिव्हिडंड दिलें आहे.

---

## विक्रीकराची बाकी

३० एप्रिल, १९६० अखेर मुंबई राज्यांत ४८,३६८ व्यापाऱ्यां-कडून ५,७३,४८,६९४ रु. ची विक्रीकराची बाकी येणें आहे.

---

## मुंबई राज्याच्या भाडेनियंत्रण कायद्यांतील "आवश्यक पुरवठा व सोय"

### " नादुरुस्त झालेला लिफ्ट दुरुस्त केलाच पाहिजे "
### [(१९६०) ६२ मुंबई लॉ रिपोर्टर ३८०]

रिफायनरी बिल्डिंग या नांवाच्या इमारतीची बॉम्बे बुलिअन असोसिएशन ही संस्था मालक असून त्या इमारतीचा ५ वा मजला जीवतलाल प्रतापसी ह्या इसमानें भाड्यानें घेतला होता. त्यावेळीं ५ व्या मजल्याला जाण्याकरितां या इमारतींत लिफ्ट नव्हती परंतु लिफ्ट बसविण्यांत आल्यावर तिचा उपयोग भाडेकरूला करूं देण्यांत येईल असा करार ठरला. त्याप्रमाणें १९४२ सालीं त्या इमारतींत लिफ्ट बसविण्यांत आली आणि तेव्हांपासून १८ वर्षें जीवतलाल यांस ५ व्या मजल्यांत जाण्याकरितां त्या लिफ्टचा उपयोग करूं देण्यांत आला. १९५९ सालीं त्या लिफ्टमध्यें बिघाड होऊन ती नादुरुस्त झाली. परंतु घरमालकानें त्यांत दुरुस्ती करण्याचें टाळल्यामुळें जीवतलालनें मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या क. २४ खालीं स्मॉल कॉज कोर्टाला असा अर्ज केला कीं, लिफ्टची सोय आपणास बंद करण्यांत आली आहे; कारण घरमालकानें लिफ्टमध्यें आवश्यक ती दुरुस्ती केलेली नाहीं. सबब लिफ्टची सोय आपणास पुन्हा पूर्ववत् प्राप्त करून देण्यांत यावी.

या अर्जाला घरमालकानें विरोध केला. आपल्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळें लिफ्ट चालू राहणें बंद झाले असल्यामुळें लिफ्टची सोय आपण काढून घेतली असें म्हणतां येणार नाहीं असें घरमालकाचें म्हणणें होतें. तसेंच घरमालकाचें म्हणणें असेंहि होतें कीं, लिफ्ट झिजून गेली असून पैशाच्या अभावामुळें त्या जागीं नवीन लिफ्ट बसविणें आपणास शक्य नाहीं. अव्वल कोर्टानें घरमालकाचें म्हणणें न ऐकतां लिफ्टची सोय घरमालकानें भाडेकरूला पूर्ववत् प्राप्त करून द्यावी असा आदेश दिला. त्यावर घरमालकानें स्मॉलकॉज कोर्टाच्या बेंचकडे रिव्हिजन अर्ज केला. परंतु तो अर्ज नामंजूर करण्यांत आल्यामुळें घरमालकानें मुंबई हायकोर्टांत रिव्हिजन-अर्ज केला.

हायकोर्टांत घरमालकातर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, झिजून बेकाम झालेल्या लिफ्टला दुरुस्ती न करणें याचा अर्थ भाडेकरूनें भोगलेली आवश्यक सोय त्याच्याकडून काढून घेतली असा होत नाहीं. आपल्या म्हणण्याला आधार म्हणून त्याच्यातर्फे क. २४ च्या स्पष्टीकरण २ चा दाखला देण्यांत आला. स्पष्टीकरण २ चा आशय पुढीलप्रमाणें आहे—

" या कलमाच्या उद्देशाकरितां, आवश्यक पुरवठा अथवा सोय बंद करणें यांत घरमालकाच्या ज्या कृत्यांमुळें स्थानिक अधिकाऱ्यानें आवश्यक पुरवठा अथवा सोय बंद केली अशा कृत्यांचाहि समावेश होतो. "

वरील स्पष्टीकरणानें घरमालकाच्या म्हणण्याला कोणतीच पुष्टी मिळूं शकत नाहीं. कलम २४ आणि स्पष्टीकरण २ वरून असें दिसून येईल कीं, आवश्यक पुरवठा अथवा सोय बंद करणें यांत स्पष्टीकरणांत दिलेल्या कृत्यांचाच समावेश होतो एवढेंच नव्हे तर ज्या कृत्यांचा परिणाम म्हणून असा पुरवठा अथवा सोय बंद होते अशा कृत्यांचाहि समावेश होतो. लिफ्टला जर मालकानें कुलूप लावलें तर क. २४ खालीं त्यानें आवश्यक पुरवठा अथवा सोय बंद केली असें म्हणतां येईल. तसेंच जर घरमालकानें नादुरुस्त लिफ्टला आवश्यक ती दुरुस्ती केली नाहीं अथवा लिफ्ट चालू स्थितींत ठेवली नाहीं तर लिफ्टचा उपयोग करणें बंद होऊन आवश्यक पुरवठा अथवा सोय घरमालकानें काढून घेतली असें म्हणतां येईल.

वरीलप्रमाणें निकाल देऊन हायकोर्टानें खालच्या कोर्टाचा हुकूम कायम केला आणि रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला.

**सारांश**—मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या क. २४ आणि स्पष्टीकरण २ वरून असें दिसून येईल कीं, आवश्यक पुरवठा अथवा सोय बंद करणें यांत घरमालकाच्या ज्या कृत्यांचा परिणाम म्हणून आवश्यक पुरवठा अथवा सोय बंद होते अशा कृत्यांचाहि समावेश होतो. बिघडलेल्या लिफ्टला जर घरमालकानें आवश्यक ती दुरुस्ती केली नाहीं आणि ती चालू स्थितींत ठेवली नाहीं तर त्यामुळें लिफ्टचा उपयोग होणें बंद होऊन त्याचा अर्थ आवश्यक पुरवठा अथवा सोय घरमालकानें बंद केली असा होईल.

— न्यायबोध, ऑगस्ट १९६०

## कामगारविषयक कायद्यांविषयीं कांहीं विचार

अकोला येथील रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष, श्री लक्ष्मी ऑइल मिल कंपनीचे श्री. ए. रा. महाजनी ह्यांनीं अकोला रोटरी क्लबांत भारतामधील कामगारविषयक कायद्यासंबंधीं एक प्रबंध वाचला. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे.

भारतामधील कामगारविषयक कायदे पाश्चिमात्य देशांतील एतद्विषयक कायद्यांच्या आधारानें बनविण्यांत आले आहेत. पण, भारतामधील परिस्थिति भिन्न आहे. शिवाय, पाश्चिमात्य देशांतील कायदे एक शतकभर विकास पावत होते हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. दुसरें असें कीं, भारतामधील ट्रेड युनिअन चळवळीच्या पुढाऱ्यांनीं कामगारांना त्यांच्या हक्कांचीच फक्त शिकवण दिली; कर्तव्यासंबंधीं ते गप्प राहिले. त्याचा परिणाम उत्पादन घटण्यांत झाला आहे. भारतामधील कामगारविषयक कायदे आधींच सदोष आहेत व पुष्कळदा त्यांची अंमलबजावणी अधिकाऱ्यांतर्फे योग्य रीतीनें होत नाहीं. उदाहरणार्थ. किमानवेतनाबाबतचा कायदा घ्या. कामगाराला किमान वेतन देण्यांत आलें पाहिजे असें कायदा सांगतो. पण, किमान वेतनाचा किमान उत्पादनाशीं कांहींच संबंध नसतो. त्यामुळें उत्पादनांत घट होणें अपरिहार्यच होतें. मग कारखान्यांतील कामचुकार कामगारांना हुडकून काढून कामावरून काढून टाकण्याचें मालक ठरवतो. पण त्याला एकदम तसें करतां येत नाहीं. कांहीं ठराविक पद्धतीनेंच त्याला तसें करतां येतें. पुष्कळदां कारखान्यांतील लेबर ऑफिसरला कारखान्याच्या कामाची नीटशी माहिती नसते. त्यामुळें उत्पादनासाठी शिस्तीची किती आवश्यकता आहे, हें त्याच्या गांवींहि नसतें.

अशा परिस्थितींत मध्यवर्ती व राज्य सरकारांनीं उद्योगधंद्यांची पहाणी करून त्यामधील सर्व यंत्रसामग्रीचा उपयोग करण्यांत येत आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. सर्व यंत्रसामग्रीचा उपयोग करून उत्पादन वाढत असेल तर ठीकच; पण तसें होत नसेल तर घटलेल्या उत्पादनाबाबत चौकशी करून कामगारविषयक धोरणाची उजळणी करण्यांत आली पाहिजे. उद्योगधंद्यांना मारक अशा प्रकारची कामगार चळवळ केवळ खाजगी मालकीच्या धंद्यापुरतीच मर्यादित राहिलेली नाहीं हें लक्षांत घ्यावयास हवें. आतां बँका आणि सरकारी कचेऱ्या व कारखाने ह्यांच्यापर्यंत चळवळीचे हात पोंचले आहेत. तेव्हां सरकारनें आपलें कामगारविषयक धोरण त्वरित बदललें पाहिजे. तरच राष्ट्र-विघातक अशा कामगार-चळवळीपासून उद्योगधंदे वांचतील. सध्यां आपले पुढारी परदेशांकडून कर्जें, यंत्रसामग्री व तांत्रिक ज्ञान ह्यांची मदत घेऊन मोठ्या प्रमाणावर नियोजित अर्थव्यवस्था उभारण्याच्या प्रयत्नांत आहेत. म्हणून कामगार चळवळींच्या घातक कृत्यांनीं देशाला अपाय होणार नाहीं ह्याची दक्षता घेतली गेली पाहिजे. खाजगी मालकीचे उद्योगधंदे व सरकारच्या मालकीच्या अनेकविध संस्था ह्या दोन्हींच्या बाबतींत सारखेच कायदे लागू करण्यांत आले पाहिजेत. तरच कामगार व मालक ह्यांचे संबंध चांगले राहतील.

## १५ निवडक शेड्यूल्ड बँकांची कर्जे व त्यांवरील व्याज

(आंकडे कोटी रुपयांचे)

डिसेंबर, १९५९ अखेर

| व्याजाचा दर | रक्कम | एकूणशीं प्रमाण% |
|---|---|---|
| १. २% पर्यंत | ३·४३ | ०·५ |
| २. २% वेवर आणि ३% पर्यंत | २·८८ | ०·५ |
| ३. ३% वेवर आणि ४% पर्यंत | ३१·२७ | ५·० |
| ४. ४% वेवर आणि ५% पर्यंत | १५०·८५ | २४·१ |
| ५. ५% वेवर आणि ६% पर्यंत | ३१७·८६ | ५०·८ |
| ६. ६% वेवर आणि ७% पर्यंत | १००·६८ | १६·१ |
| ७. ७% वेवर | १८·५१ | ३·० |
| ८. एकूण | ६२५·३० | १००·० |
| सर्व शेड्यूल्ड बँकांची एकूण कर्जे | ८४६·०० | |
| ८ वें ९ शीं प्रमाण % | ७३·९ | |

वरील तक्त्यावरून दिसून येईल, कीं, सुमारें ५१% कर्जावर (३१८ कोटी रु. कर्जावर) ५ ते ६% व्याज आकारण्यांत आलें; २४% कर्जावर (१५१ कोटी रु. कर्जावर) ४ ते ५% व्याज घेण्यांत आलें. फक्त ३% कर्जावरील (१९ कोटी रु. कर्जावरील) व्याजाचा दर ७% पेक्षा अधिक होता.

---

## गुजरातसाठी खताच्या कारखान्यासाठी शिफारस

गुजरात राज्याला लागणाऱ्या खतांबाबत अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारनें तज्ज्ञांची एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें राज्यासाठी एक खताचा कारखाना काढण्याची शिफारस केली आहे. संकल्पित कारखाना खाजगी मालकीचा असण्याचा संभव असून त्यांत नत्रयुक्त खतें तयार करण्यांत येतील. कारखान्याच्या उभारणीसाठी २८ कोटी रुपये भांडवल लागेल. भावनगरजवळ अगर खंबायतजवळ सांपडलेल्या तेलाच्या खाणींच्या नजीक तो उभारण्यांत येईल. त्यासाठी १,००० एकर जागा लागेल असा कमिटीचा अंदाज आहे. कारखान्यांतून दरसाल ९६ हजार टन नत्रयुक्त खत निर्माण करण्यांत येईल व त्यामुळें ३,००० कामगारांना रोजगार मिळेल. कारखान्यांत तयार होणारें खत सहकारी संस्थांमार्फत विकतां येईल आणि त्यामुळें त्याची घाऊक किंमत बरीच स्वस्त पडेल असा कमिटीचा अंदाज आहे. खंबायत आणि अंकलेश्वर येथें तेलशुद्धीचे कारखाने उभारण्यांत येणार आहेत. ह्या कारखान्यांतील वायां जाणारे रासायनिक पदार्थ खताच्या कारखान्याला वापरता येण्यासारखे आहेत. गुजरात राज्यांतील पिकें, तेथील जमीन आणि शेतकऱ्यांचीं पिकें घेण्याची आवड इत्यादि बाबींचा कमिटीनें अभ्यास केला आणि गुजरात राज्याला ४,१५,००० टन कृत्रिम खत लागेल असा अंदाज बांधला. कारखाना खाजगी मालकीच्या क्षेत्रांत निघाला तर त्यासाठी जमीन मिळवून देणें, रेल्वेचा फाटा देणें, पाणीपुरवठ्याची सोय करणें, इत्यादि बाबतींत सरकारने मदत द्यावी अशी सूचना कमिटीनें केली आहे.

---

## भारताला संयुक्तरीत्या मदत मिळण्याचा संभव

भारताला आर्थिक मदत देऊं इच्छिणाऱ्या ५ देशांची बैठक पॅरिस येथें भरणार आहे. आर्थिक मदत देणाऱ्या देशांनीं एकत्र येऊन भारताला संयुक्तरीत्या मदत द्यावी अशी भारताची सूचना आहे. ह्या सूचनेला बैठकींत जागतिक बँकेतर्फे पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. तथापि ह्या बाबतींतील बँकेची भूमिका जरा कठीण आहे. जागतिक बँकेतर्फे मुख्य मुद्यावर जोर देण्याचें काम करण्यांत येईल असा अंदाज आहे. भारताला परदेशांकडून जर मदत मिळाली नाहीं तर ह्या ४० कोटी लोकसंख्येच्या देशाला प्रगति करतां येणार नाहीं ह्या गोष्टीकडे बँक प्रामुख्यानें लक्ष वेधेल. भारताला अनेक देशांकडून मदत मिळाली पाहिजे असें बँकेचे प्रथमपासूनच मत आहे. कांहीं अटींवर मदत देण्याची तयारी प्रगत देश नेहमींच दाखवत आले आहेत. पण अशा प्रकारची मदत बँकेला विशेष आवडत नाहीं. असें असलें तरी विशिष्ट विकासयोजनांना कांहीं अटींवर मदत देण्यांत येत असली तर बँकेला विरोध करण्याचें कारण पडत नाहीं. कारण, बँक स्वतःच अशा प्रकारचीं कर्जे देते आणि हीं सर्व कर्जे अनेक देशांनीं संयुक्तरीत्या दिलेलीं असतात. बँकेच्या ताज्या अहवालांत कर्जांबाबतच्या ह्या बाजूचा विचार करण्यांत आलेला नाहीं. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाचा विचार अहवालांत करण्यांत आला आहे. भारताला संयुक्त मदत देण्याच्या योजनेला ब्रिटनसारखे कांहीं देश सशर्त मान्यता देण्याचा संभव आहे. सर्व देशांनीं मिळून योजनाबद्ध रीतीनें मदत देण्याचें ठरविलें तर ब्रिटनहि तशा मदतीस तयार होईल व कर्जावर बंधनें घालण्यांत येणार नाहींत.

---


**दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

(स्थापना : १९११)

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

**भरपाई झालेलें भाग भांडवल :**

भागीदारांतर्फे रु. ४९ लक्ष

मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, ३० लक्ष

**गंगाजळी व इतर फंड :** रु. ५९ लक्ष

**एकूण ठेवी :** रु. १७ कोटी

**खेळतें भांडवल :** रु. २९ कोटींचे वर

**मुंबई राज्यांतील ३०४ ठिकाणीं शाखा व संबंधित संस्था**

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड

मॅनेजिंग डायरेक्टर.

**गुजराती स्त्रियांच्या आत्महत्त्या**—१९५९ सालीं गुजरात राज्यांत ५२० स्त्रियांनीं आत्महत्त्या केली. घरगुती भांडणें, दीर्घकालीन आजार, भेरवागम्य, विवाहबाह्य गरोदरपणा, इत्यादी कारणांनीं ह्या आत्महत्त्या करण्यांत आल्या. अशी माहिती राज्य-विधानसभेंत सांगण्यांत आली. सरकारी उपायांपेक्षा सामाजिक दृष्टिकोनांत इष्ट असा बदल होण्याच्या आवश्यकतेवर सरकारतर्फे भर देण्यांत आला.


**साखरेचा बंद कारखाना**—राजकोटपासून ८० मैलांवरील धोळा ह्या ठिकाणचा साखरेचा कारखाना गुजरात सरकारनें एका शेतकरी सहकारी संस्थेला चालविण्यास देण्याचें ठरविलें आहे. हा कारखाना पूर्वींच्या भावनगर संस्थाननें काढला होता. तो गेलीं १२ वर्षें बंद आहे. कारखान्यांत रोज ५०० टन ऊंस गाळणारी यंत्रसामग्री आहे.

**प्रसिद्धि करून पैसा नको**—रशिअन प्रदेशावर उड्डाण करून हेरगिरी केल्याबद्दल अमेरिकन वैमानिक मि. पॉवर्स ह्याला मॉस्को येथील कोर्टांत शिक्षा झाली. मि. पॉवर्स ह्यांच्या पित्याला ह्या प्रकरणाचा खास वृत्तांत छापण्याबद्दल 'लाइफ' ह्या नियतकालिकानें मोठी रक्कम देऊ केली आहे. पण खुद्द वैमानिकाच्या पत्नीला कोणतीहि प्रसिद्धि अगर पैसा नको आहे.

**सरकार बोनस देणार**—केरळ सरकारच्या स्टेट ट्रॅन्सपोर्ट संघटनेनें आपल्या नोकरांना १९५९-६० सालाचा बोनस म्हणून एक महिन्याचा पगार देण्याचें ठरविलें आहे. ह्या वर्षीं संघटनेला तोटा आला असूनहि बोनस देण्यांत येणार आहे. ह्यापूर्वीं जेव्हां जेव्हां बोनस देण्यांत आला होता त्यावेळीं नफा झालेला होता.


किर्लोस्कर स्थापना १८८८

पावरवर चालणारा
ऊंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटल-पासून तयार केलेले असून वर्षानुवर्षे बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)



५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



**कण आणि क्षण**

(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति] [किं. १ रु. ८ आ.





आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या सख्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे, त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पती-युक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

अर्थ-वैभवाच्या इतिहासांतील महत्त्वाचें पान



१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

## पोलादाचे बाबतींत भारत स्वयंपूर्ण होणार

### औद्योगिक प्रगतीच्या मार्गातील महत्त्वाचा टप्पा

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या योजनेंतील संघटित उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत लोखंड व पोलाद या मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासास शेतकी प्रमाणेंच महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. या योजनेंत या धंद्यांच्या विकासाच्या संकल्पित कार्यक्रमाकडे दृष्टिक्षेप टाकतां, उत्पादनांतील वाढ जरी दुसऱ्या योजनेइतकीच असली तरी ती निवडक वस्तूंसंबंधीं व अधिक परिश्रम करावयास लावणारी असल्याचें दिसून येईल. उद्योगधंद्यांची जसजशी वाढ होत जाते तसतशा विविध प्रकारच्या पोलादी मालाची मागणीदेखील वाढत जाते आणि म्हणून पोलादाच्या उत्पादनाचें नियोजन करण्याचें काम अधिक गुंतागुंतीचें होऊन बसतें. त्याचबरोबर या धंद्याचा आर्थिक दृष्टया योग्य तऱ्हेनें विकास व्हावा म्हणून सरकारी मालकीच्या तीन पोलाद कारखान्यांचा विकास समतोल प्रमाणांत करणें भाग आहे. अगोदरच स्थापन झालेल्या कारखान्यांची एकदां वाढ व विस्तार केल्यावर तेथील उत्पादनांत विविधता आणण्यास मर्यादितच वाव असतो हें लक्षांत घेतलें पाहिजे.

या दोनही बाजू कशा सांभाळतां येतील याचा विचार करूनच तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भिलाई, दुर्गापूर व रूरकेला आणि भद्रावती येथील या कारखान्यांची वाढ करण्यांत येईल, तर बोकारो येथें एक संपूर्णपणें नवीन असा लोखंड व पोलादाचा कारखाना काढून त्या ठिकाणीं मिश्र पोलादाच्या आणि हत्यारां–अवजारांसाठी लागणाऱ्या पोलादाचें उत्पादन करण्यासाठी खास यंत्रसामग्री बसविण्यांत येईल.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ६० लाख टन पोलादी गोळयांचें उत्पादन करून त्याचा अवजड रेल, फिशप्लेटस, क्रॉसिंग स्लीपर, स्लीपर बार, निरनिराळ्या प्रकारचे क्राँकीट बार, स्प्रिंग स्टील, चाकें, टायर, टिनप्लेटी, तारा, स्टेनलेस स्टील, इत्यादि विविध प्रकारच्या मिळून ४,४३,५०० टन तयार वस्तूंचें उत्पादन करण्यासाठी उपयोग करण्याचें ठरलें होतें.

### पुढील पांच वर्षांतील पोलादासाठी मागणी

आतांपर्यंत पोलादाचा सर्वांत जास्त वापर भारतीय रेल्वेकडून होत आहे. उपलब्द पोलादापैकीं जवळ जवळ दहावा हिस्सा पोलाद रेल्वे वापरतात. तदनंतर पोलादावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे, आणि सरकारच्या पाटबंधारे, वीज व इतर बांधकामविकास योजनांचा क्रम लागतो. पुढील पांच वर्षांत पोलादासाठी किती मागणी होईल तें या योजनेच्या स्वरूपावरच अवलंबून राहील. तथापि, पोलादाच्या उत्पादनाच्या बाबतींत अधिक व्यापक दृष्टीकोन स्वीकारण्यांत आला आहे. यापुढें उत्पादक उद्योगधंद्यांस अधिकाअधिक प्रमाणांत पोलाद लागेल. रेल्वेकडूनहि पूर्वीप्रमाणेंच मोठ्या प्रमाणांत पोलादाचा वापर होईल. देशाच्या सर्वसाधारण आर्थिक विकासाबरोबरच रस्ते बांधण्याच्या कार्यक्रमाचा व टपाल आणि तारखात्यांचाहि विकास करावा लागेल.

पोलादाचा उपयोग करून घेण्यांत अनेक तंत्रवियात्मक बदल होत आहेत. उदाहरणार्थ, औद्योगिक बांधकामांत व पूल इत्यादींच्या बांधणींत अवजड स्ट्रक्चर सेक्शन ऐवजीं पोलादी पत्र्यांचा वापर सुरू झाला आहे. इमारतींच्या बांधकामांत तर साधे बार व रॉड ऐवजीं हाय टेन्सिल वायर वापरांत येत आहे. वीजवाहक खांबासाठी आतां पोलादी नळ्यांऐवजीं अशा वायरचाच उपयोग करण्यांत येतो. हे बदल लक्षांत घेऊन पत्रे व तक्के, वायर, टूल व मिश्र पोलाद यांसाठी पोलादाच्या इतर वस्तूंपेक्षा अधिक झपाट्यानें मागणींत वाढ होईल असें वाटतें.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षापर्यंत तयार होणाऱ्या एकूण सुमारें ७० लाख टन तयार पोलादापैकी ( सुमारें १ कोटी टन पोलादी गोळे ) २० लाख टनाचे पत्रे व तक्के आणि सुमारें २० लाख टनाचे बार व रॉड तयार करावे लागतील असा अंदाज आहे. दर डोई उत्पन्नांत वाढ होऊन शहरी विभागांची लोकसंख्या वाढूं लागल्यावर टिनच्या पत्र्यापासून करण्यांत येणाऱ्या डब्यांचा खपहि वाढेल.

### पोलाद कारखान्यांचा विकास

पोलादाबरोबरच अनेक प्रसंगीं बरड लोखंड या शब्दप्रयोगाचा वापर होत असला तरी ते पोलादापेक्षा अगदीं निराळे आहे. फाउंड्रींना रेल्वे स्लीपर आणि पाइप ओतण्यासाठी, त्याचप्रमाणें यंत्रसामग्रीचे अनेक भाग तयार करण्याकरतां बरड लोखंडाचा वापर करावा लागतो. संरक्षित पाणी-पुरवठ्याच्या सोयींत वाढ झाल्यावर बरड लोखंडाच्या ओतीव पाइपसाठी होणाऱ्या मागणींत बरीच वाढ अपेक्षित आहे. बरड लोखंडासाठी सुमारें २० लाख टन मागणी होण्याचा अंदाज आहे. भिलाई, दुर्गापूर व रूरकेला या तीन कारखान्यांची बरड लोखंडाच्या उत्पादनांत प्रत्येकी २० ते २५ लाख टन वाढ होईल, इतकी वाढ करतां येईल.

तथापि, या कारखान्यांचा याप्रमाणें ताबडतोब विकास हातीं घेण्यांत कांहीं अडचणी आहेत. मुख्य अडचण म्हणजे पोलादाच्या विशिष्ट वस्तूंसाठी होणारी मागणी. या वस्तु यापैकी प्रत्येक कारखान्यांत तयार करतां येण्यासारख्या आहेत. उदा. भिलाई. या कारखान्याचा २५ लाख टन उत्पादन होईल इतका विस्तार करण्यासाठी परकीय चलनाची व्यवस्था झाली असली तरी रुळांची आणि अवजड बांधकामी पोलादाची मागणी कमी असल्यामुळें हें उत्पादन २१ लाख टन पोलादी गोळयांपर्यंतच करावें लागेल. हीच गोष्ट रूरकेला व दुर्गापूर कारखान्यांची. तेथील उत्पादनहि अनुक्रमें १८ लाख टन आणि १६ लाख टन पोलादी गोळ्यांपर्यंत जाऊं शकेल. या कारखान्यांचा विकास झाल्यावर देशाच्या पोलाद उत्पादनशक्तींत ६० लाख टनांवरून सुमारें ८५ लाख टनांपर्यंत वाढ होईल. म्हणून इतर प्रकारच्या पोलादाचें उत्पादन करण्यासाठी बोकारो येथें एक लोखंड आणि पोलादाचा कारखाना स्थापण्याचा विचार आहे.

### खास प्रकारच्या पोलादाचें उत्पादन

उद्योगधंद्यांची जसजशी वाढ होत जाईल तसतशी अधिकाधिक प्रमाणांत खास प्रकारच्या पोलादाची गरज वाढेल. देशांत सध्यां स्टेनलेस स्टीलच्या संघटित प्रमाणावरील उत्पादनाची सोय नाहीं. मिश्र व हत्यारोपयोगी पोलादाचें उत्पादनहि इतकें अपुरें आहे कीं त्यासाठी असलेली सध्यांची मागणीहि आपण भागवूं शकत नाहीं. सध्यां अशा प्रकारच्या ४० हजार टन पोलादासाठी वार्षिक मागणी आहे, ती तिसऱ्या योजनेच्या शेवटच्या वर्षापर्यंत २ लाख टनांपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे. यांपैकी निकृष्ट दर्जाच्या मिश्र पोलादाचें त्यामानानें अधिक सोप्या साधनसामग्रीनें आणि पद्धतींनीं उत्पादन करणें शक्य आहे. म्हणून अशा प्रकारच्या पोलादाचें उत्पादन करणाऱ्या आणखी कांहीं कारखान्यास परवानगी देण्याचा विचार आहे. याउलट, उच्च दर्जाच्या मिश्र पोलादाच्या उत्पादनासाठी खास यंत्रसामग्रीची आवश्यकता असल्यानें छोट्या कारखान्यांस त्याचें उत्पादन हातीं घेतां येणार नाहीं.

उच्च दर्जाच्या मिश्र पोलादाच्या उत्पादनासाठी सरकारी मालकीचा ५० हजार टन उत्पादनशक्तीचा एक कारखाना उभारण्यासाठी तपशीलवार योजना कन्सल्टिंग इंजिनिअरांच्या एका भारतीय फर्मनें आंखली आहे. २ लाख टन उत्पादनशक्ती-पर्यंत या कारखान्याचा विकास करतां येईल. त्याचप्रमाणें विविध प्रकारच्या पोलादी वस्तूंच्या उत्पादनासाठीहि खाजगी क्षेत्रांत आणखी कांहीं कारखाने काढण्यास परवानगी देण्यांत येईल.

### लोखंडी कांबींचें उत्पादन

छोट्या प्रमाणावर पोलादाचें उत्पादन ही भारतास नवी बाब नाहीं. बार, रॉड व इतर खास पोलादी वस्तू तयार करणारे सुमारें २०० रीरोलिंग कारखाने सध्यां देशांत आहेतच. या कारखान्यांस कच्चा माल म्हणून प्रामुख्यानें कांबी लागतात. कांबींचें उत्पादन बहुतांशीं एकत्रित लोखंड-पोलाद कारखान्यांत होत असतें, तथापि अशा कारखान्यांतील कांबींच्या उत्पादनासहि मर्यादा आहेतच. ही गोष्ट लक्षांत घेऊन तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कांबींचें उत्पादन ७ लाख टनांवरून १० लाख टनांवर नेण्यांत येईल. इलेक्ट्रिक फर्नेसचा उपयोग करून मोडींत काढलेल्या पोलादा-पासूनहि आणखी सुमारें २ लाख टन कांबींचें उत्पादन करतां येईल.

### बरड लोखंडाचें उत्पादन

बरड लोखंडाच्या उत्पादनासाठी सध्यां मद्रास राज्यांत एक व ओरिसा राज्यांत एक मिळून दोन कारखाने आहेत. आणखी कारखाने सुरू करून हें उत्पादन २ लाख टनांपर्यंत नेण्याचा विचार आहे. या उत्पादनास पूरक म्हणून नेविली येथील लिग्नाइटचा उपयोग करून घेतां येईल असा एक कारखाना तिसऱ्या योजनेंत काढण्याचें संकल्पिण्यांत आलें आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील लोखंड आणि पोलाद धंद्यांच्या या विकास कार्यक्रमामुळें समाजवादी समाजरचनेचा पाया अधिक बळकट होईल. त्यामुळें देशाची लोखंडाची आणि पोलादाची गरज जवळजवळ पूर्णांशानें भागली जाऊन देश पोलादासारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांतील उत्पादनांत स्वावलंबी होईल.

---

**आंध्र राज्यांतील प्रेक्षणीय स्थळें**—आंध्र राज्याच्या हौशी प्रवासी-विकासमंडळानें हौशी प्रवाशांच्या सुखसोयी वाढविण्याचें ठरविलें आहे. प्रवास अधिक आरामाचा करण्यासाठी आणि होटेल-मधील राहण्याच्या सोयी अधिक चांगल्या करण्यासाठी मंडळानें सूचना केल्या आहेत. तिरुपती व नागार्जुनसागर ह्या प्रेक्षणीय स्थळांकडे विशेष लक्ष देण्यांत यावयाचें आहे.

**प्राप्तिकर भरणारांची कबुली**—भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांच्याकडे प्राप्तीवरील कर भरण्यास पात्र अशा ५ करचुकव्यांनीं आपण होऊन कर चुकविल्याची कबुली दिली आहे. गेलीं १० वर्षें ह्या लोकांनीं कर चुकविलेला आहे. कराची रक्कम सुमारें ८ लाख रु. आहे. सरकार आपणाला कडक रीतीनें वागवणार नाहीं असें त्यांना वाटतें.

**सुताची सहकारी गिरणी**—गुजरातमधील सुताची पहिली सहकारी गिरणी लिमडी येथें चालू करण्यांत आली आहे. गिरणी उभारण्यासाठी ५० लाख रुपये भांडवल लागलें. त्यांत १२ हजार चात्या आहेत. गिरणींत ५०० कामगारांना रोजगार मिळाला आहे. सौराष्ट्रांतील विणकरांना तिचा फायदा मिळेल.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.
शाखा :—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष
रावसाहेब य. द. खोले
श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.